देशदूत
# My जळगाव
। गुरुवार, दि. २४ एप्रिल २०२५ । पान ६ ।

जाहिरात कात्रण आणल्यास विशेष सूट
भारतातील प्रसिद्धीप्राप्त गुप्तरोग चिकित्सक
लैगींक समस्या, गुप्तरोग
शीघ्रपतन, नपुसंकता, मुल न होणे, शुक्राणूंची कमी आणि मधुमेहाने आलेल्या कमजोरीवर कमी दिवसात खात्रीशीर इलाज केला जाईल.
(टीपः रुग्णालयात येण्याआधी फोन करुन अपॉईंटमेंट घ्यावी.)
(EMD) नकली डॉक्टर केंद्रोंसे सावधान
डॉ.मंशा डिस्पेन्सरी
प्रकाश टॉकीजमागे, बऱ्हाणपूर (म.प्र.) (कॉम्प्युटराईज्ड)
०७३२-५२५१४५९. मोबा.९८२६२७८८७१
भोंदू वैद्यांपासून सावध रहा! रुग्णालय दररोज सुरु असते. वेळ सकाळी ११ ते रात्री ९
(आपला पत्रव्यवहार किंवा उपचाराची माहिती गुप्त ठेवली जाईल.)


## टोपी घ्या, टोपी





जळगाव । शहरात तापमानाचा पारा चांगलाच वाढत आहे. डोक्याचा उन्हापासून बचाव व्हावा म्हणून बाजारात आकर्षक टोप्या उपलब्ध झाल्या आहेत.

# जळगाव शहरातील मद्याच्या दुकानात चोरी

**जळगाव । प्रतिनिधी**

शहरात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून दुचाकी चोरी, घरफोडीसारख्या घटना सातत्याने समोर येत आहे. यातच आता ईच्छादेवी चौफुलीजवळील एका वाईन शॉपमधील ७० हजार रुपयाच्या रोकडसह लाखो रुपये किमतीची दारू चोरून नेल्याची घटना आज सकाळी २३ रोजी उघडकीस आला. चोरट्यांनी दुकानातील सीसीटीव्ही कॅमेरे तोडले असून डिव्हिआर देखील चोरून केला आहे.

**रोकडसह दारु लंपास**

याबाबत असे की, भुसावळ येथील रहिवासी असलेले अशोकशेठ नागराणी यांचे जळगावात ईच्छादेवी चौफुलीजवळ महामार्गालगत अशोका लिकर गॅलरी नावाने मद्य विक्री दुकान आहे. मंगळवारी रात्री ते नेहमीप्रमाणे दुकान बंद करून घरी गेले. पहाटेच्या सुमारास चोरट्यांनी संधी साधत दुकानाचे शटर उचकवून आत प्रवेश केला. दरम्यान, चोरट्यांनी दुकानात प्रवेश करीत गल्ल्यातील ७० हजार रुपये रोख रक्कम आणि जवळपास १२६ बॉक्स देशी विदेशी दारू लंपास केली आहे. दारूची एकूण रक्कम अंदाजे १० लाख रुपये आहे. चोरट्यांनी दुकानातील सीसीटीव्ही कॅमेरे तोडले असून डिव्हिआर देखील चोरून केला आहे. घटनेनंतर उपविभागीय पोलीस अधिकारी संदीप गावीत, पोलीस आणि एलसीबी यांच्या पथकाने यांनी घटनास्थळी भेट दिली. फॉरेन्सिक टीमने ठसे व अन्य पुरावे गोळा केले असून, अधिक तपास सुरू आहे.

# पाकिस्तानचा झेंडा जाळून निषेध

## कठोर कारवाईची मागणी

**जळगाव । प्रतिनिधी**

पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरात पाकविरूध्द संतापाची लाट उसळली आहे. देशभरातून या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला जात असून ठिकठिकाणी आंदोलने केली जात आहे. तसेच दहशतवाद्यांना पोसणाऱ्या पाकचा झेंडा पायदळी तुडवून दहशतवाद्यांविरोधात कठोर करवाई करण्याची मागणी केली जात आहे. दरम्यान आज शहरात देखिल विविध संघटनांकडून निषेधात्मक आंदोलने करण्यात आली.

**शिंदे सेनेने जाळला पाकचा झेंडा**

शहरातील टॉवर चौकात शिवसेनेच्या शिंदे गटातर्फे पाकिस्तानचा झेंडा पायदळी तुडवून आणि जाळून निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी जिल्हाप्रमुख विष्णू भंगाळे, संतोष पाटील यांच्यासह पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी पाकविरूध्द जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

**सकल हिंदू समाजाचे आज आंदोलन**

पहलगाम येथे इस्लामी अतिरेक्यांनी हिंस्त्र पशुलाही लाजवेल असे मृत्यूचे थैमान माजवत निरपराध लोकांना त्यांचा धर्म विचारत निवडून हिंदूंना गोळ्या घातल्या. या हिरव्या सैतानांचा विश्व हिंदू परिषद तीव्र धिक्कार करत आहे. या धर्मांध नरपशूंच्या निषेधार्थ उद्या दि. २४ रोजी सकाळी १० वा. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन व इस्लामी आतंकवादाच्या प्रतिकात्मक पुतळ्याच्या दहनाचे आयोजन करण्यात आले आहे.





### भारतीय जनता पार्टी

दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरात संतापाची लाट उसळली आहे. जळगावात भाजपातर्फेही पाकचा ध्वज जाळुन निषेध करण्यात आला. यावेळी भाजपचे माजी उपमहापौर सुनील खडके, राजेंद्र घुगे, अमित भाटीया, आशिष सपकाळे, पियुष कोल्हे, मंगला बारी, गणेश सोनवणे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रिपाइं

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया तर्फे दहशतवादी हल्याचा मुत्यूमुखी पावलेल्यांना आदराजंली वाहून भ्याड हल्याचा महानगर अध्यक्ष अनिल अडकमोल यांनी जाहिर निषेध केला आहे हल्ला करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे असल्याचे अध्यक्ष अनिल अडकमोल यांनी म्हटले आहे,

### मुस्लीम समाज, इकरा थीम

दहशतवादी हल्ल्याचा इकरा थीम कॉलेज आणि मुस्लिम समाजाकडून तीव्र निषेध करण्यात आला. माजी उपमहापौर करीम सालार, जमात-ए-इस्लामी हिंद जळगावचे जिल्हाध्यक्ष सोहेल अमीर शेख, सलीम इनामदार, अयाज अली, इरफान सालार आणि खालिद मेंबर यांच्यासह कॉलेजमधील सर्व शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी हल्ल्यातील मृतांना आदरांजली वाहिली. करीम सालार यांनी दहशतवादाचा तीव्र शब्दात निषेध करत, अशा अतिरेक्यांचा विरोधात कठोर पावले उचलावीत, अशी मागणीही त्यांनी केली.



## वाढदिवस शुभेच्छा



**संजय गरुड**
माजी, जि.प.सदस्य, जळगाव



**संजय पवार**
चेअरमन, जिल्हा बँक, जळगाव

मान्यवरांच्या वाढदिवसापूर्वी एक दिवस आधी हितचिंतकांनी खालील ई-मेल आयडीवर संपूर्ण नाव छायाचित्रासह माहिती पाठवावी.
deshdootmidc@gmail.com

# मालमत्ता करातून ४ कोटी २७ लाखांची वसुली

## १० टक्के सूट योजनेला प्रतिसाद



**जळगाव । प्रतिनिधी**

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ता मिळकत धारकांना सन २०२५- २६ या आर्थिक वर्षाकरिता मालमत्ता कराचा आगाऊ भरणा करता यावा यासाठी १० टक्के सूट देण्याची योजना सुरू केली आहे. या अंतर्गत महापालिकेत आजअखेरपर्यंत ४ कोटी २७ लाख रूपयांचा भरणा झाल्याची माहिती प्रशासकीय सूत्रांनी दिली.

महापालिकेतर्फे मालमत्ता कराचा आगाऊ भरणा करणाऱ्या मिळकत धारकांना करात १० टक्के सूट देण्याची योजना आयुक्त तथा प्रशासक ज्ञानेश्वर ढेरे यांनी दिनांक २१ एप्रिल पासून लागू केलेली आहे. सदर योजना लागू केल्या दिनांक पासून आज दिनांक २३ एप्रिल २०२५ अखेर पावतो प्रभाग समिती क्रमांक १ ते ४ नुसार ४ कोटी २७ लाख रूपये वसूल झाले आहे.

**प्रभागनिहाय वसुली**
**प्रभाग समिती क्र.१**
भरणा रुपये १.३५ कोटी
**प्रभाग समिती क्र. २**
भरणा रुपये ६५.३० लाख
**प्रभाग समिती क्र. ३**
भरणा रुपये ८४.८८ लाख
**प्रभाग समिती क्रमांक.४**
एकूण भरणा रुपये १.४१ कोटी

**३० एप्रिलपर्यंत मुदत**

योजनेचा लाभ हा दिनांक ३० एप्रिल अखेर पावेतोच दिला जाणार असल्याने शहरातील मिळकत धारकांनी याची नोंद घ्यावी. या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेऊन मालमत्ता कराचा आगाऊ भरणा मुदतीत करावा असे आवाहन आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांनी केलेले आहे.

# पावडरच्या घर्षणामुळे आग लागून साहित्य जळाले

**जळगाव । प्रतिनिधी**

कंपनीमध्ये पावडरच्या घर्षणामुळे आग लागून मशिनरी, कंपनीतील मटेरिअल जळाले. सुदैवाने यात कुणाला दुखापत झाली नाही. ही घटना १८ एप्रिल रोजी शिरसोली रस्त्यावरील जैन व्हॅली येथे घडली. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात आगीची नोंद करण्यात आली आहे. शिरसोली रस्त्यावर असलेल्या जैन व्हॅली येथे कांदा डिहॅड्रेशन प्लँटमधील मिलिंग विभागात बॅग हाऊसमध्ये पावडरचे घर्षण झाले. त्यामुळे आग लागली व त्यात मशिनरी, मटेरिअल जळून नुकसान झाले. या आगीत एकूण किती नुकसान झाले, हे अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात आगीची नोंद करण्यात आली आहे.

# महागडी सायकल चोरीस

**जळगाव । प्रतिनिधी**

शहरातील आदर्श नगरात राहणाऱ्या भूमीका कृष्णकांत येवलकर यांचा मुलगा दि. २० रोजी सायंकाळी सायकलने लायन्स हॉल परिसरात गेला होता. सायकल हॉलच्या गेटसमोर लावल्यानंतर ती खेळ्यासाठी निघून गेला. याचवेळी चोरट्याने येवलकर यांच्या मुलाची १६ हजार रुपये किंमतीची महागडी सायकल चोरुन नेली. अखेर रामानंद नगर पोलीसात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# तीन पत्ती जुगारावर धाड

**जळगाव । प्रतिनिधी**

रात्रीच्या वेळी पथदिव्याखाली सुरू असलेल्या तीन पत्ती जुगारावर शहर पोलिसांनी कारवाई करीत ११ जणांना ताब्यात घेतले. या ठिकाणाहून १३ हजार ८८० रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. ही कारवाई २१ एप्रिल रोजी रात्री लाकूडपेठ भागात करण्यात आली. लाकूडपेठ भागामध्ये एका घराच्या बाजूला पथदिव्यांच्या उजेडात तीन पत्ती हा जुगार सुरू असल्याची माहिती शहर पोलिस ठाण्याचे प्रभारी पोलिस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांना मिळाली. त्यांनी सपोनि शीतलकुमार नाईक, रामचंद्र शिखरे, पोउनि महेश घायतड, सहाय्यक फौजदार सुनील पाटील, पोहेकॉ किशोर निकुंभ, पोकॉ उद्धव सोनवणे यांना कारवाईच्या सूचना दिल्या. त्यानुसार पथकाने लाकूडपेठेत जाऊन जुगार अड्ड्यावर कारवाई केली. तेथून ११ जणांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून एकूण १३ हजार ८८० रुपये हस्तगत करण्यात आले.

**११ जणांना घेतले ताब्यात**

## थोडक्यात...

### वसुंधरा दिनानिमित्त मार्गदर्शन



**जळगाव** । खुबचंद सागरमल विद्यालयात वसुंधरा निमित्त राष्ट्रीय हरित सेने तर्फ विद्यार्थांना लक्ष्मीकांत महाजन यांनी मार्गदर्शन केले पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे प्रदुषण रोखणे वाहनांचा वापर कमी करणे वृक्षतोड थांबवणे पाणी अडवणे पाणी जिरवणे वृक्षारोपण व संवर्धन हे उपक्रम राबविणे गरजेचे आहे वसुंधरा वाचवण्यासाठी वरिल उपाय योजना करुन वसुंधरा वाचवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे याप्रसंगी लक्ष्मीकांत महाजन कल्पना देवरे हरीत सेना प्रमुख प्रवीण पाटील संजय पाटील राहुल देशमुख व विद्यार्थी उपस्थित होते

### चाऱ्याच्या ६०० पेंढ्या खाक

**जळगाव** । शेतात ठेवलेल्या चाऱ्याला आग लागून त्यात ६०० पेंढ्या जळून खाक झाल्या. ही घटना २१ एप्रिल रोजी रात्री कानळदा शिवारात घडली. या प्रकरणी शेतकऱ्याने एका जणावर संशय व्यक्त केला असून त्याच्याविरुद्ध तालुका पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. तालुक्यातील कानळदा येथील निवृत्ती प्रभाकर बोरोले यांची कानळदा शिवारात शेती आहे. तेथे त्यांनी दादरचा चारा ठेवलेला होता. २१ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास चाऱ्यास आग लागून त्यात ६०० पेंढ्या जळून खाक झाल्या. यामध्ये शेतकऱ्याचे ३६ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी शेतकऱ्याने गावातील एका जणाविरुद्ध संशय व्यक्त केला आहे. आगीसंदर्भात तालुका पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

# विद्यार्थ्यांसाठी ध्यानधारणा मोफत कार्यशाळा उत्साहात

**जळगाव । प्रतिनिधी**

उन्हाळ्याच्या सुट्टीत मुलांना विरंगुळा हवा असतो, त्यासाठी ध्यानधारणेच्या माध्यमातून एकाग्रता वाढविण्यासाठी मोफत ध्यानधारणाची कार्यशाळा नुकतीच संपन्न झाली.

विजय अमृत फाउंडेशन आणि एसडी फाउंडेशन संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सहा ते अकरा वयोगटातील झालेल्या या कार्यशाळेत मुलांनी विविध गमती जमती असलेले खेळ खेळून अनेकविध चित्रे ही रंगविली. प्रत्येक खेळामधून ध्यान धारणेचे महत्त्व पटवून देण्यात आले. डॉ. आकांक्षा कुलकर्णी यांनी दोन तासांच्या कार्यशाळेत मुलांना ध्यानाचे महत्त्व पटवून दिले. यावेळी डॉ. अविनाश कुलकर्णी, एसडी फाउंडेशनचे सचिव दिनेश थोरात, ॲड. निखिल कुलकर्णी, समर्थसिंग पाटील उपस्थित होते.



# स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी जोमाने कामाला लागा!

## शिवसेना ठाकरे गटाचे ज्येष्ठ नेते सुभाष देसाई यांचे आवाहन

**जळगाव । प्रतिनिधी**

जिल्ह्यात आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी मोठे आव्हान आहे. शिवसैनिक हा आव्हानांचा सामना करीत आला आहे. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत जोमाने कामाला लागा अशा सूचना शिवसेना ठाकरे गटाचे ज्येष्ठ नेते सुभाष देसाई यांनी आज एका बैठकीत दिल्या.

ठाकरे गटाचे नेते सुभाष देसाई हे बुधवारी जळगाव जिल्हा दौऱ्यावर आले असता, अजिंठा विश्रामगृहात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. याआधी उद्धव सेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. या बैठकीत संपर्कप्रमुख संजय सावंत, जिल्हाप्रमुख कुलभुषण पाटील, महानगरप्रमुख शरद तायडे, माजी महापौर जयश्री महाजन, लक्ष्मण पाटील, महानंदा पाटील, विराज कावडीया यांच्यासह उद्धव सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या तयारीबाबत देसाई यांनी आढावा घेतला. यावेळी जिल्हाप्रमुख कुलभुषण पाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.




### संघटना बांधणी करा

शिवसेनेत फुटीनंतर काही नेते शिंदेसेनेत गेले आहेत. मात्र, आपल्याकडे शिवसैनिकांची ताकद आहे. त्यामुळे विधानसभा, लोकसभेच्या निवडणुकीत पक्षाचा झालेला पराभव विसरुन आता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांसाठी संघटना बांधणी करून एकत्र येणे गरजेचे असल्याचे देसाई यांनी सांगितले. आगामी काळात पक्षासाठी संघर्ष मोठा आहे. मात्र, या संघर्षावर मात करून पक्ष संघटनेच्या जोरावर पुन्हा पक्षाला चांगले दिवस आणायचे आवाहन देसाई यांनी केले.

cmyk